**नटवर्य प्रभाकर पणशीकर रंगभूमी जीवन गौरव**
**<u>पुरस्कार निवड समिती पुनर्घटन करणेबाबत.</u>**

**महाराष्ट्र शासन**
**पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग**
**शासन निर्णय क्र. रंजीपु १५२२ (१३) /प्र. क्र. ४०० /सां.का.४**
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक : २२ नोव्हेंबर, २०२२

**वाचा :-** १) शासन निर्णय, सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य व विशेष सहाय्य विभाग, क्र. सांकास २००५/प्र.क्र.३८८/सां.का.३, दिनांक २ मार्च, २००६
२) शासन निर्णय, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, क्र. पुरक २०११/प्र.क्र.१५०/सां.का.४, दिनांक १३ एप्रिल, २०१२
३) शासन निर्णय, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, क्र. संकीर्ण २०२२/प्र.क्र.६७/समन्वय, दिनांक ८ सप्टेंबर, २०२२
४) संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय यांचे पत्र क्र. सांकासं/ ३०७९, दिनांक ९ नोव्हेंबर, २०२२

**<u>प्रस्तावना :-</u>**

उपर्निर्दिष्ट क्र. १ येथील शासन निर्णयान्वये महाराष्ट्र राज्य रंगभूमी जीवन गौरव पुरस्कार प्रदान करण्याबाबत निर्णय घेण्यात आला. सदर पुरस्कार नटवर्य प्रभाकर पणशीकर या नावांने देण्यात येतो. पुरस्कार्थींची निवड करण्यासाठी निवड समिती गठीत करण्यात येते. उपर्निर्दिष्ट क्र. ३ येथील शासन निर्णयान्वये सदर समितीवरील अशासकीय सदस्यांच्या नियुक्त्या रद्द करण्यात आलेल्या आहेत. त्यामुळे विषयांकित समितीचे पुनर्घटन करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**<u>शासन निर्णय</u> :-**

नटवर्य प्रभाकर पणशीकर रंगभूमी जीवन गौरव पुरस्कार निवड समितीचे खालील प्रमाणे पुनर्घटन करण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.

**अ) <u>शासकीय सदस्य</u>**

| | | |
|---|---|---|
| १. | मा. मंत्री, सांस्कृतिक कार्य | अध्यक्ष |
| २. | सचिव, पर्यटन व सांस्कृतिक कार्य | सदस्य |
| ३. | संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय | सदस्य सचिव |

**<u>ब) अशासकीय सदस्य</u>**

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. विक्रम गोखले | अशासकीय सदस्य |
| २. | श्री. गिरीश ओक | अशासकीय सदस्य |
| ३. | श्री. अशोक समेळ | अशासकीय सदस्य |
| ४. | श्री. अशोक सराफ | अशासकीय सदस्य |

सदर समिती या शासन निर्णयाच्या दिनांकापासून पुढील तीन वर्षे कालावधीसाठी किंवा शासनाचे पुढील आदेश होईपर्यंत, यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत कार्यरत असेल.

२. **<u>प्रवास व बैठक भत्ता</u> :-**

समितीच्या अशासकीय सदस्यांना वित्त विभागाच्या प्रचलित शासन निर्णयानुसार प्रवास भत्ता व बैठक भत्ता अनुज्ञेय राहील.

३. यासाठी संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय यांना नियंत्रण अधिकारी व लेखाधिकारी आहरण व संवितरण म्हणून घोषित करण्यात येत आहे.

४. सदरील खर्च हा मागणी क्र. झेडडी-२, २२०५ कला व संस्कृती, पंचवार्षिक योजनांतर्गत योजना, राज्य योजनांतर्गत योजना, (०२) (०९) कला व सांस्कृतिक संस्थांना सहाय्यक अनुदान, (२२०५ १५३४) ३१ सहाय्यक अनुदाने (वेतनेतर) या लेखाशिर्षाखाली उपलब्ध होणाऱ्या त्या त्या आर्थिक वर्षातील मंजूर तरतुदीतून भागविण्यात यावा.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात येत असून त्याचा सांकेतांक क्रमांक २०२२११२२१६३९५३४३२३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित केलेला आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

VILAS RAMRAO THORAT

Digitally signed by VILAS RAMRAO THORAT
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=TOURISM AND CULTURAL AFFAIRS DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=e6cc4d20348a52de465c7c34a61591bbe69b747ae11457103a0cfb9a57fc6ce6, pseudonym=2908C178C06A08E995849046F8BCFB7325B57851, serialNumber=CB03C92B399CC89310BF1378C184D97A4B7B9B98E926EA8E71DD7BC9CB273631, cn=VILAS RAMRAO THORAT
Date: 2022.11.22 16:44:53 +05'30'

**( विलास रा. थोरात )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
२. मा. उपमुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
३. मा. मंत्री, सांस्कृतिक कार्य यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
४. सचिव (सांस्कृतिक कार्य), पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
५. उप सचिव (सांस्कृतिक कार्य), पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
६. संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई
७. सर्व अशासकीय सदस्य (संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालयामार्फत)
८. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
९. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
१०. महालेखापाल (लेखा परीक्षा) -१ महाराष्ट्र, मुंबई
११. महालेखापाल (लेखा परीक्षा) - १ महाराष्ट्र, नागपूर
१२. महालेखापाल (लेखा अनुज्ञेयता) -२ महाराष्ट्र, मुंबई
१३. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२ महाराष्ट्र, नागपूर
१४. कार्यासन अधिकारी, अर्थसंकल्प शाखा, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग
१५. निवड नस्ती, सां.का.४.